भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०२/२०१७

१) घराचे गेट समोर ठेवलेल्या मोटार सायकलची चोरी . :—

दिनांक २३/०२/२०१७ वा. २३.०० वा. दर. यातील फिर्यादीचे व डीलने आपल्या घराचे गेट समोर आपली टिव्हीएस अपाची ग्रे रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ३२०५ किंमती ३०,०००/—रु. ची हॅन्डल लॉक न करता ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी आमीर हमीष अकबानी वय २७ वर्ष, रा. प्रभाग क्र. ४ लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोस्टे लाखनी हे करीत आहेत.

२) मारोती सुजुकी चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकाला धडक देवुन एकाचा मृत्यु व एकाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २४/०२/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातील मोटार सायकल क्र. एमएच ३५ एन ४९१७ चा चालक मृतक मुकेश अनीरुध्द रहांगडाले हा पत्नी सौ. रिंकु सोबत भंडारा कडुन बेला कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक मारुन मोटार सायकल चालक जागीच मरण पावला. व त्यांचे पत्नीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मारोती उर्फ गोलु चैतराम बन्सोड वय २५ वर्ष रा. योजना नगर महर्षी शाळे समोर बेला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भांदवी. १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) मोटार सायकल चालकाने मोटार सायकलला धडक देवुन, एक जखमी . :—

दिनांक २४/०२/२०१७ चे वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन कोका कडे जाणाऱ्या हिरो होन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३५ एम २६१५ चा चालक अभय दुर्याधन शेन्डे रा. खडकी यांचे मोटार सायकलला बोंडे फाटा येथे धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रामदास सदाशिव कोडवते वय ६१ वर्ष, रा बोंडे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २४/०२/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी युवराज दिवारु केरझरे वय ४७ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली यांचा मोटा भाऊ धनराज दिवारु केरझरे वय ५२ वर्ष, रा. साकोली हा आपले मालकीचे ॲक्टीवा मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही ५५७१ ने नागझीरा रोडने जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व नाफडे नर्सींग होम साकोली यांचे डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पो.नी. बि. आर. गाडे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.